Vol 4 Issue 5 June 2014

ISSN No : 2230-7850

International Multidisciplinary Research Journal

# Indian Streams Research Journal

Executive Editor
Ashok Yakkaldevi

Editor-in-Chief
H.N.Jagtap

**Welcome to ISRJ**

**RNI MAHMUL/2011/38595** **ISSN No.2230-7850**

Indian Streams Research Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial board.Readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.

**Regional Editor**

Dr. T. Manichander

Mr. Dikonda Govardhan Krushanahari
Professor and Researcher ,
Rayat shikshan sanstha's, Rajarshi Chhatrapati Shahu College, Kolhapur.

## *International Advisory Board*

Kamani Perera
Regional Center For Strategic Studies, Sri Lanka

Janaki Sinnasamy
Librarian, University of Malaya

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Anurag Misra
DBS College, Kanpur

Titus PopPhD, Partium Christian University, Oradea,Romania

Mohammad Hailat
Dept. of Mathematical Sciences, University of South Carolina Aiken

Abdullah Sabbagh
Engineering Studies, Sydney

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Fabricio Moraes de Almeida
Federal University of Rondonia, Brazil

George - Calin SERITAN
Faculty of Philosophy and Socio-Political Sciences Al. I. Cuza University, Iasi

Hasan Baktir
English Language and Literature Department, Kayseri

Ghayoor Abbas Chotana
Dept of Chemistry, Lahore University of Management Sciences[PK]

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Ilie Pintea,
Spiru Haret University, Romania

Xiaohua Yang
PhD, USA

......More

## *Editorial Board*

Pratap Vyamktrao Naikwade
ASP College Devrukh,Ratnagiri,MS India

R. R. Patil
Head Geology Department Solapur University,Solapur

Rama Bhosale
Prin. and Jt. Director Higher Education, Panvel

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University,Kolhapur

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Chakane Sanjay Dnyaneshwar
Arts, Science & Commerce College, Indapur, Pune

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary,Play India Play,Meerut(U.P.)

Iresh Swami
Ex - VC. Solapur University, Solapur

N.S. Dhaygude
Ex. Prin. Dayanand College, Solapur

Narendra Kadu
Jt. Director Higher Education, Pune

K. M. Bhandarkar
Praful Patel College of Education, Gondia

Sonal Singh
Vikram University, Ujjain

G. P. Patankar
S. D. M. Degree College, Honavar, Karnataka

Maj. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

S.Parvathi Devi
Ph.D.-University of Allahabad

Sonal Singh,
Vikram University, Ujjain

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

R. R. Yalikar
Director Managment Institute, Solapur

Umesh Rajderkar
Head Humanities & Social Science YCMOU,Nashik

S. R. Pandya
Head Education Dept. Mumbai University, Mumbai

Alka Darshan Shrivastava
Shaskiya Snatkottar Mahavidyalaya, Dhar

Rahul Shriram Sudke
Devi Ahilya Vishwavidyalaya, Indore

S.KANNAN
Annamalai University,TN

Satish Kumar Kalhotra
Maulana Azad National Urdu University

**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.isrj.org**

Indian Streams Research Journal
ISSN 2230-7850
Impact Factor : 2.1506(UIF)
Volume-4 | Issue-5 | June-2014
Available online at www.isrj.net

# *अस्पृश्यता उद्धारक सामाजिक प्रबोधनाचा उद्गाता : डॉ. भिमराव रामजी आंबेडकर*

***प्रा. डॉ. सुजाता सुधीर गायकवाड***
विद्यावर्धिनी महाविद्यालय, धुळे.

***प्रस्तावना :-***

जगाच्या पाठीवरील ज्या देशांमध्ये प्राचीन काळापासून मानवी संस्कृतीचा विकास झाला त्या देशांपैकी भारत हा एक देश आहे. भारतीय संस्कृतीच्या विकासाकडे दृश्टीक्षेप टाकताच त्या संस्कृतीचे दोन भाग दिसतात. एक अत्युतम तर दुसरा तितकाच हीन भारतीय संस्कृतीतील अत्युत्तम भाग म्हणजे अध्यात्म व तत्त्वज्ञान आणि त्या संस्कृतीतील हीन भाग म्हणजे धार्मिक व सामाजिक प्रथा होय. त्या प्रथा अत्यंत हीन व घृणास्पद आहेत. त्यावेळी आर्यांचे भारतावर आक्रमण झाले तेंव्हा तेथील मूळच्या रहिवाशांना जिंकून त्यांच्याशी शरीरसंबध जोडून व आर्थिक देवघेव करून ते परस्परात मिसळून गेले व एक नवा समाज निर्माण झाला. असे असले तरी काही विचारवंतांच्या मनात शुद्ध रक्ताच्या खुळाने मूळ धरल्यावर समाजाने भक्कम तट पाडण्यासाठी नवीन अधिनियम त्यांनी शोधून काढले.

***वर्णव्यवस्था :***

आपला सामाजिक वर्ण शुद्ध राखण्यासाठी पक्का बंदोबस्त केला. यज्ञयाग करणाऱ्या पुरोहित वर्गाने कालांतराने कर्मकांड व त्याबद्दल पाळावयाचे विधिविशेष वाढवत नेणे आणि त्यामधून या वर्णाचे शुद्ध व अशुद्ध असे दोन विभाग झाले ही विभाजनाची प्रक्रिया इतर वर्णामध्येही घेऊन त्यामधून हिंदुस्थानात असंख्य जाती निर्माण झाल्या सध्या भारतीय हिंदू समाजात जवळजवळ पाचशे प्रमुख जाती अस्तित्वात आहेत. ही प्रत्येक जात दुसरीपासून स्वतःस पूर्णपणे अलग ठेवते, त्यातील काही जातींना अस्पृश्य, अदर्शनीय परिहा असे मानण्यात येते यातील काही जातींना उच्चवर्णियांचा स्पर्श तर होऊच नये पण या जाती त्यांच्यादृष्टीसही पडू नयेत अशी काळजी घेतली जात असे एखादा उच्चवर्णीय येतांना दिसला की, मग तो समोरून येवो वा मागून त्याची चाहूल लागताच आपण त्याच्या दृष्टीस पडू नये म्हणून जे अदर्शनीय आहेत त्यांनी अंगावर सावली पडू द्यायची नाही अशा बेताने त्या अस्पृश्याला त्यांच्यापासून 15 ते 45 पावलांचे अंतर ठेवावे लागे. या अस्पृश्यवआदर्शनीय लोकांच्या स्पर्शाने अगर दृष्टीपथात आल्याने उच्चवर्णीय हिंदुंना पाप लागते असे हिंदुची शास्त्रे व पुराणे सांगतात. महर्षी व्यासांनी महाभारत लिहिल्यानंतर बऱ्याच शतकानंतर ही पुराणे धर्मशास्त्रे लिहिली गेली तो पर्यंत समाजातील हे जाती विभाजन वाढतच गेले. गीतेतील भगवान श्रीकृष्णाने स्वतः हे चातुर्वर्ण्य निर्माण केले अशी स्मृती पुराणातून कसून मांडण्याची प्रक्रिया सुरू झाली जातीवर व त्यांच्या आचारविचारांवर शिक्कामोर्तब झाले आणि त्या कल्पना कायम स्वरुपाच्या त्रिकालाबाधित सत्य म्हणून पूजनीय ठरविल्या गेल्या.

***सामाजिक नंतरच राजकीय सुधारणा :***

त्यावेळी भारतीय लोक पाश्चिमात्य लोकांच्या सामाजिक, राजकीय व आर्थिक पण शास्त्रीय विचार सरणीच्या संपर्कात आले तेव्हा येथील स्त्री पुरुषांमध्ये नवी जागृती घडून आली मग येथील विचारवंत भारतीयांनी आपली सामाजिक, धार्मिक, राजकीय व आर्थिक समाजरचना निरनिराळ्या घटकात जो सुसंवाद लागतो त्याच्या कशी आड येते याचा उलगडा होऊ लागला. ती व्यवस्था सुधारली पाहिजे हे त्यांना प्रकर्षाने जाणवू लागले. दुर्दैवाने या अस्पृश्य मानल्या गेलेल्या जातीत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा जन्म झाल्यामुळे व या जाती व्यवस्थेच्या अमानुष रुढी परंपरेचे चटके त्यांना सहन करावे लागले,भोगावे लागले. त्यामुळे त्यांनी स्वतः चिकित्सकपणे स्मृतीपुराणांचा अभ्यास करुन मनुस्मृती कशी चुकीची आहे व त्यामुळे हिंदुस्थानचे कसे नुकसान झाले. माणुस–माणसापासून कसा दुरावला गेला हे दाखविण्याचा प्रयत्न केला. ब्रिटीशांकडून देखील त्यांनी याबाबतची प्रथम सुधारणा करण्यास मागणी केली. तशी करावयाची नसल्यास या जातीगटांमध्ये स्वतंत्र मतदार संघ राखीव जागा व स्वतंत्र दलित स्थानाची मागणी त्यांनी ब्रिटिशांकडे केली होती. त्याप्रमाणे हीच पार्श्वभूमी असल्यामुळे प्रथम सामाजिक सुधारणा व नंतर राजकीय सुधारणा असाच क्रम त्यांनी प्रबोधनाचा लावला होता.

***सुधारणा युगाचा उदय :***

एकोणिसाव्या शतकाच्या मध्यापासून इंग्रजी शिक्षणाच्या माध्यमातून ज्ञानाच्या नव्या नव्या कक्षा भारतीय विचारवंतांना दिसू लागल्या. पूर्वीपासून अनेक धर्म, पंथ, जाती आणि भाषा यांनी हा भारत देश विभागला गेला होता. इस्टइंडिया कपंनीच्या शिरकावानंतर इंग्रजांच्या

छत्राखाली जेव्हा भारत आला तेव्हा शासनाच्या दृष्टीने का होईना त्यांनी आसे तू हिमाचल एकच शासनपद्धती प्रचारात आणली तेव्हा एतदेशीयांना इंग्रजांच्या नव्या शासनपद्धतीची इंग्रजी शिक्षणातून नव्या विचारांची ओळख झाली ख्रिस्ती मिशनरांच्या धर्मप्रसारामधूनही येथील सुशिक्षित सुधारकांना हिंदू समाजातील त्रुटी जाणवू लागल्या. इंग्रज अधिकाऱ्यांच्या संपर्काने व प्रोत्साहनाने या त्रुटी नाहीशा करण्याचे प्रयत्न सुरू झाले त्यामुळे एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात या सुधारणा युगास सुरुवात झाली.[1]

समाज एक जिनसी करायचा म्हणजे आपआपसातील भेदाभेदामुळे त्या बंदिस्त चौकटी अगर उतरंडी म्हणा निर्माण झालेल्या होत्या त्या सैल किवा मोकळ्या केल्या पाहिजेत. आणि श्रृती, स्मृती पुराणांचे अवडंबर कमी केले पाहिजे असे या विचारवंतांनी आपल्या मनाशी ठरविले या जाणिवेतून ब्राह्मो समाज, आर्य समाज व प्रार्थना समाजासारख्या पंथांची निर्मिती झाली. महाराष्ट्रात प्रार्थना समाजाच्या वतीने श्री. विठ्ठल रामजी शिंदे, सर नारायण गणेश चंदावरकर यांनी अस्पृश्यता नष्ट करण्यासाठी प्रयत्न चालविले. त्यांच्याही अगोदर महाराष्ट्रात महात्मा ज्योतिबा फुले यांनी अस्पृश्यता नष्ट करण्यासाठी स्वतःच्या घरापासून सुरुवात केली आपल्या दारी असलेला पाण्याचा हौद त्यांनी अस्पृश्यांसाठी खुला केला. त्यांच्या शिक्षणासाठी शाळा काढल्या एक विद्या नसली तर किती अनर्थ होतात. माणूस कसा पशू अथवा घाण्याचा बैल बनतो ते गरीबांना पटवून देत. सर्व मानव समान आहेत. देवाच्या पूजेला मधस्थ पुरोहित नको, परमेश्वर एकच नव्हे. स्त्रियांनीही शिक्षण दिले पाहिजे. उच्च वर्णियांच्या स्त्रियांबद्दलच्या अनिष्ठ चालीरीतीचे (जसे सतीप्रथा, बालविवाह, जरठविवाह ) इ. अनिष्ठ चालीचे उच्चाटन झाले पाहिजे स्त्री पुरुष निर्माण झाले पाहिजे इ. अत्यंत मूलगामी विचारांचा व मतांचा त्यांनी पुरस्कार केला आणि स्वतः पती–पत्नीनेही सावित्रीबाई फुलेनींही रुढीपरंपरेची पर्वा न करता सामाजिक छळ सोसून ते विचार कृतीत आणले. शिक्षणाची दारे खुली नसलेल्या दारिद्याने पिचलेल्या ज्यांना लोक गुलाम म्हणत अशा अस्पृश्यता समाजातील काही लोकांनी आपली वतनदारी सोडून शहराकडे प्रयाण करण्यास प्रवृत्त केले. ब्रिटीश राजवटीत इंग्रज अधिकाऱ्यांच्या घरात व सैन्यात नोकऱ्या मिळू लागल्या. इंग्रजांकडून त्यांना माणुसकीची वागणूक मिळू लागली ते त्यांच्या दैन्यावस्थेची सहानुभतीने चौकशी करू लागले त्यांची गुलामगिरी कशी नष्ट करता येईल व त्यांना शिक्षण घेऊन नोकऱ्या कशा उपलब्ध करून देता येतील याचा विचार इंग्रजांनी करण्यास सुरूवात केली. शैक्षणिक संस्थांमधून अस्पृश्यता पाळणे हा गुन्हा ठरविले, पण कायदा अंमलात यायला फार दिवस लागले.[2]

### *डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे कार्य :*

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना संस्कृत शिकवण्यापासून वंचित व्हावे लागले. डॉ. बाबासाहेबक आंबेडकरांचा जन्म ब्रिटिश सैनिकी छावणीच्या ठिकाणी महू गावी 14 एप्रिल 1811 रोजी झाला. त्यांचे वडील लष्करात मेजर होते. परंतु त्यावेळेस त्यांना जातीयतेची तेवढी झळ पोहचली नव्हती कारण लष्करात सर्व जातीचे लोक भरती केले गेले होते. परंतु त्यांचे वडील जेव्हा पेन्शनर झाले तेव्हा त्यांना महू गाव सोडून कोकणातील आपल्या मूळच्या गावी कुटुंबाला नेणे भाग पडले. पण भाऊबंदाने (रामजीचे कुटुंब) वाटेकरी आल्यावर तेथे राहू न देणे एवढेच त्यांच्या हाती होते. अशा या गावापासून दुरावलेल्या लोकांनीच चळवळीस जोर आणला. पुढे साताऱ्याजवळ माळणी या ठिकाणी सरकारी तळ्याचे काम चालले होते. तेथे मजूरांची हजेरी लावण्याचे काम रामजी बाबांना मिळाले. त्याचवेळी साताऱ्याच्या शाळेत त्यांना वर्गात शेवटी बसवून त्यांना फळावर गणित सोडविण्यास जात असतांना सवर्ण विद्यार्थ्यांनी अस्पृश्यांचा विटाळ होऊ नये म्हणून केलेली डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची हेटाळणी, गोरेगाव येथे वडिलांना भेटावयास जातांना गाडीवाहकाकडून मिळालेली वागणूक, संस्कृत शिकविण्यास नकार देणारे सांगडे शास्त्री, न्हाव्याचा केस कापण्यास नकार, गुरुजींचे भेदाभेदीचे वर्तन या साऱ्या गोष्टी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या मनात घर करून होत्या. आपला समाज प्रगत झाल्याशिवाय आपल्या समाजाची ही गुलामगिरीची अवस्था नष्ट होणार नाही. याची पूरेपूर जाणीव डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना झाली होती. त्यामुळे आधी स्वतःच खूप शिणि घेण्याचे मनोमनी ठरवून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या ध्येयाकडे वाटचाल करण्यास सुरुवात केली. त्याप्रसंगी त्यांना बडोद्याचे सयाजीराव गायकवाड व शाहू महाराजांनी केलेली मदत मोलाची ठरली. आपण एवढ्या परदेशात शिक्षण घेऊन आल्यानंतरही बडोदा संस्थानिकांनी सहकारी कर्मचाऱ्यांची जातीयतेची वागणूक पाहून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी ही अस्पृश्यता कशी नष्ट करता येईल यासाठी प्रयत्न सुरू केले.[3]

कोलंबिया विद्यापीठातून अभ्यासासाठी असलेली बैठक सोळा सोळा तासाची करण्यात आली. जून 1913 पर्यंत त्यांनी बी. ए. नंतर आपल्या नेत्रदिपक यशामुळे त्यांनी आपल्या विषयावर संपादन केले होते. 1915 ला एम. एम . ची पदवी ग्रहण केल्यावर ते पीएच्. डी. च्या प्रबंधासाठी जुळवाजुळव करू लागले होते. हिंदुस्थानचे राष्ट्रीय उत्पन्न एक ऐतिहासिक व चिकित्सात्मक अभ्यास हा विषय प्रो. एडविन सेलिगमन यांच्या मार्गदर्शनाखाली पूर्ण केला. त्यानंतर ते 1916 मध्ये इंग्लंडला गेले. तेथे जाण्याचे प्रयोजन म्हणजे अर्थशास्त्रामध्ये त्यांनी एम. एस. सी. करण्याचे ठरविले होते. त्यासाठी त्यांनी ब्रिटिश मुझियम लंड आणि लंडन स्कूल ऑफ इकोनॉमिक्स ॲण्ड पॉलिटिक्स यातून वाचनालयातून प्राव्हिन्शियल डिसेन्ट्रलायझेशन ऑफ इंडियन फायनान्स (भारतीय वित्त व्यवस्थेचे प्रांतनिहाय विकेंदीकरण) यणा शीर्षकाने पुढे पुढील काळात प्रसिद्ध झालेल्या प्रबंधासाठी त्यांना साहित्य गोळा करावयाचे होते. परंतु बडोदा सरकारची शिष्यवृत्तीची मुदत संपली होती. त्यांना मुदत वाढवून मिळविण्यासाठी विनंती अर्ज लिहिले. या विनंतीचा काहीच उपयोग झाला नाही. त्यामुळे त्यांनी लंडन युनिर्व्हसीटीकडून चार वर्षाकरिता प्रबंध सादर करण्याची मुदत मागून घेतली.[4] कौटुंबिक गरजा भागवून शिक्षण घेत असलेले डॉ. बाबासाहेब आंबेडकर जुलै 1921 ला अचानक लंडनला जाण्याची तयारी करीत होते. मोठ्या औद्योगिक संस्थांतून, बँकामध्ये व सरकारी खात्यातही नोकरी मिळविण्याची त्यांनी खटपट केली. परंतु नोकरी मिळणे मुश्किल होते. शेवटी दीड वर्षानतर मुंबईत सिडने कॉलेज ऑफ कॉमर्स मध्ये अर्थशास्ताचे प्राध्यापक म्हणून दरमहा 450 रु. नोकरीवर रुजू झाले. त्यावेळी ते परळच्या कामगार वस्तीमधील चाळीत राहत होते. ही नोकरी करतांना त्यांनी अत्यंत काटकसरीने जीवन कंठून खंडित अभ्यासक्रम पूर्ण करण्यास लागणाऱ्या शिक्षणासाठी 9 हजार रुपये बँकेने शिष्यवृत्ती दिली होती ती घेऊन व कोल्हापूरच्या शाहू महाराजांकडून व आणखी दोन श्रीमंत मित्रांकडून अर्थसहाय्य घेतले. ते 5 जुलै 1920 ला लंडनला रवाना झाले होते. तेथून त्यांनी एमएमसी (अर्थ) डी. एस. सी (अर्थ) या पदव्या ऑगस्ट 1920 ते फेब्रुवारी 1923 पर्यंतच्या काळात मिळविल्यात. दिवसातील आठ आठ तास ते वाचन करीत व प्रबंधासाठी नोट्स पूर्ण करीत. एक ब्रेडचा स्लाइस व कपभर बोर्नव्हीटा हाच त्यांच्या दिवसभरातील आहार असे. कारण

पोटभर जेवण करण्यास त्यांच्याजवळ पैसे नव्हते व झोपण्यास वेळ नव्हता. ''मी झोपलो तर माझा समाज जो झोपी गेला आहे तो तसाच झोपून राहील, त्याला जागे करणे हेच माझे महत्त्वाचे काम आहे.'' याची जाणीव डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना होती. त्यासाठी लागणारी बौद्धिक तयारी पूर्ण झाली होती. 1915 ते 1925 या काळात उच्चशिक्षण घेत असतांनाच त्यांनी दोन पुस्तके लिहिली होती. हिंदुस्थानातील जाती हा निबंध मानवंश शास्त्राचे प्रो. ए. ए. गोल्डन वायझर कोलंबिया विश्वविद्यालय यांच्या अभ्यास वर्गापुढे 9 मे 1916 ला वाचलेला होता. तो पुढे 1917 ला मुंबईमध्ये प्रसिद्ध केला. या हिंदुस्थानातील लहान शेती व्यवसाय व त्यावरील उपाय हा हिंदुस्थानातील शेती सुधारणेसंबंधी निबंध 1918 मध्ये मुंबईत प्रसिद्ध केला. त्यांची दोन पुस्तके डी. एस. सी. पदवीसाठी लिहलेला प्रबंध व प्रॉब्लेम ऑफ रुपी (रुपयाची समस्या) हा इंग्लंडमध्ये 1924 ला प्रसिद्ध झाला. द. इव्हॅल्यूशन ऑफ प्रॉव्हिजनल डी सेन्ट्रलायझेशन ऑफ इंपीरियल फायनान्स हा पीएच. डी. साठी लिहिलेला प्रबंध लंडनमध्ये 1925 साली प्रसिद्ध झाला. या दोन्ही ग्रंथासाठी जमा केलेल्या साहित्याची मांडणी करतांना नवे निष्कर्ष काढतांना डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या अफाट बुद्धीमत्तेबद्दल डॉ. एडविन कॅनन यांनी गौरवोद्गार काढलेले दिसून येतात.[5]

### *बहिःश्कृत हितकारणी सभेची स्थापना :*

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मिळविलेल्या या विद्वत्तेचा उपयोग त्यांनी देशाठी देशातील जनतेसाठी अस्पृश्य समजल्या जाणाऱ्या आपल्या समाजासाठी करावयाचा होता. त्यासाठी त्यांनी 1924 मध्ये बहिष्कृत हितकारणी सभा स्थापन करून अस्पृश्यता निर्मूलनासाठी चळवळ हाती घेतली व आयुष्यभर या चळवळीस वाहून घेतले. मग तो महाडचा चवदार तळ्याचा संघर्ष असो किंवा काळाराम मंदिर प्रवेशाचा सत्याग्रह असो.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना या सामाजिक चळवळीतून माणसाला माणूसपण मिळावं यासाठी हा लढा होता. प्रत्येकाला समाज पूजेचा अधिकार असावा. परमेश्वरांची जर सर्व लेकरे सारखी असतील तर मनुष्यात भेदाभेद त्यांना नको होता. स्वतःच्या पत्नीने रमाबाईंनी पंढरपुरच्या विठ्ठल दर्शनाचा आग्रह धरला असतांना बाबासाहेबांनी त्यावेळी म्हटले होते की मी प्रति पंढरपूर तयार करतो ज्यात प्रवेशाला कोणतीही बंदी, कुठलाही मज्जाव असणार नाही आणि मग बौद्ध धर्माची दीक्षा घेतल्यानंतर बुद्धांच्या धम्मप्रचाराचे कार्य हाती घेऊन आपल्या 6 कोटी दति बांधवांना त्यांनी बौद्ध धर्माची दीक्षा दिली व खऱ्या अर्थाने अस्पृश्यता घालविण्यासाठी घटनेत तशा तरतूदी केल्या की जेणे करून अस्पृश्यता नष्ट होईल.[6]

### *सारांश :*

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी चालविलेल्या अस्पृश्यता चळवळींची अस्पृश्यता नष्ट होण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या सामाजिक कार्याचा आढावा घेतांना असे आढळून येते की, गृहित धरलेली गृहितके याठिकाणी योग्य वाटतात. गृहितकांच्या आधारे निष्कर्षाप्रत येतांना असे स्पष्ट होते की, जी कीड जातीयतेच्या नावाने संपूर्ण भारतात पसरलेली आहे तिला समूळ नष्ट करणे गरजेचे आहे. ज्यामुळे जाती–जातीच्या भेदाभेदाच्या भिंती नष्ट होती व प्रगत समाज निर्माण होईल. कुठलाही समाज जाती व्यवस्थेच्या आधारे कुंठीत राहणार नाही याची खबरदारी घटनेत अशी नमूद केली आहे तशी ती घटना राबविणाऱ्या शासनाने अंगिकारल्यास जातीयतेची विषवल्ली समूळ नष्ट होण्यास वेळ लागणार नाही. अस्पृश्य वर्गातील जनतेस बौद्धिक, आर्थिक आणि राजकीयदृष्ट्या समर्थ होण्यासाठी सरकारने अशी काही धोरणे आावीत की जेणेकरून अस्पृश्यता तर नष्ट होईलच परंतु कित्येक शतके मागे असलेला हा समाज कुंठीत व प्रगतीपासून वंचित असलेला समाजाचा अभ्युदय होइल. त्यासाठी राजकीय क्षेत्रात देखील त्यांना अधिकाधिक सामावून घेतल्यास सत्तेच्या परिघात हा समाज आल्यास जातीजातीच्या भिंती ही नष्ट होतील.

### *संदर्भ*

1)चां. भ. खैरमोडे, डॉ. भिमराव रामजी आंबेडकर, अस्पृश्यांचा उद्धारक, सुगावा प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती 14 एप्रिल 1991, पृ. 5,12,15 .
2)शेवरे आर. व्ही., समता संगराचे समर्थ सेनानी बुद्धभक्त, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, मेहता पब्लिशिंग हाऊस, सदाशिव पेठ, पुणे प्रथमावृत्ती, जून 1981, पृ. 31,32,45.
3)शाम दर्यावण कार्पेडकर, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या सहवासात शंकरराव खरात, इंद्रायणी साहित्य प्रकाशन, पुणे, 1998, पृ. 46,47.
4)डॉ. बी. आर. जोशी, प्रा. सो. भाग्यरेखा जोशी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची घटनासमितीतील भाषणे भाग – 1, सुगावा प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती, मे 2000, पृ. 36–37.
5)शांताराम शंकर रेगे, भीमपर्व, सुगावा प्रकाशन, पुणे जन्मशताब्दी 1991, पृ. 94,95,81,83.
6)प्रा. प्र. दा. गायकवाड, भारतरत्न बाबासाहेब आंबेडकर, जीवन आणि संघर्ष, परिमल प्रकाशन, खडकेश्वर, औरंगाबाद, प्रथमावृत्ती, 14 एप्रिल, 1996, पृ. 56–57.



***प्रा. डॉ. सुजाता सुधीर गायकवाड***
विद्यावर्धिनी महाविद्यालय, धुळे.

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished Research Paper,Summary of Research Project,Theses,Books and Book Review for publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

- International Scientific Journal Consortium
- OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- Google Scholar
- EBSCO
- DOAJ
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database
- Directory Of Research Journal Indexing



Indian Streams Research Journal
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.isrj.org